**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत राज्यातील सर्व जिल्हयात स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहकार्याने सुक्ष्म पाणलोट विकास कार्यक्रम राबविणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र. १२२ /मग्रारो-१
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०१३

**संदर्भ :**

१) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.२७/रोहयो-१, दिनांक १५ मार्च, २०१३.
२) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन पत्र क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.२७/रोहयो-१, दिनांक २४ मे, २०१३.
३) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.०४/पुनर्बांधणी-३/ रोहयो-१, दिनांक २७ सप्टेंबर, २०१२.
४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. जलसं-२०१२/प्र.क्र.२३/जल-७, दिनांक ५ मार्च, २०१३.

**प्रस्तावना :**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक १५ मार्च, २०१३ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहभागातून पथदर्शी सुक्ष्म पाणलोट विकास कार्यक्रम राज्यातील ठाणे, नाशिक, अहमदनगर, नंदूरबार, हिंगोली, लातूर, बीड, उस्मानाबाद, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ अशा १५ जिल्हयात राबविण्यास मान्यता देण्यात आली होती. तसेच स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहभागातून पथदर्शी सुक्ष्म पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना सदर शासन निर्णयान्वये देण्यात आल्या होत्या. उपरोक्त संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक २४ मे, २०१३ च्या शासन पत्रान्वये काही सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. सदर कार्यक्रम राज्यातील निवडक १५ जिल्हयात सद्यस्थितीत प्रगतीपथावर आहे. सदर कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात मजुरक्षम कामे घेण्यास वाव असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सन २०१३-१४ या वर्षापासून उपरोक्त कार्यक्रम राज्यातील सर्व जिल्हयात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सबब उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक १५ मार्च, २०१३ चा शासन निर्णय व संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक २४ मे, २०१३ चे शासनपत्र अधिक्रमित करून शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहभागातून सुक्ष्म पाणलोट विकास कार्यक्रम राज्यातील सर्व जिल्हयात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत वर्गीकृत केलेल्या स्वयंसेवी संस्थाच्या

**अ व ब** यादीतील किंवा **राज्य संसाधन संस्था** ( **State Resource Organization (SRO)** ) च्या यादीतील स्वयंसेवी संस्थांचे तांत्रिक सहकार्य घेण्यात यावे. त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

**२. जिल्हास्तर समिति :**

या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात खालीलप्रमाणे जिल्हा स्तर समितीची नियुक्ती करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १) जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) | - अध्यक्ष |
| २) सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.) | - उपाध्यक्ष |
| ३) प्रकल्प संचालक (जि.ग्रा. वि.यं.) | - सदस्य |
| ४) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | - सदस्य |
| ५) वरिष्ठ भूवैज्ञानिक (भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा) | - सदस्य |
| ६) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत (जिल्हा परिषद) | - सदस्य |
| ७) विभागीय वन अधिकारी (वन जमिनीवरील कामासाठी) | - विशेष निमंत्रित |
| ८) उप जिल्हाधिकारी (रोहयो) | - सदस्य सचिव |

**३. जिल्हास्तर समितीच्या जबाबदाऱ्या :**

जिल्हास्तर समितीच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे असतील.

१) सदर शासन निर्णयान्वये विनिर्दिष्ट केलेल्या निकषाच्या आधारे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीची निवड करणे.

२) कार्यक्रम सुरू करण्यासाठी ग्रामसभा/ग्रामपंचायत यांची सहमती मिळविण्याकरीता आवश्यक सूचना संबंधितांना देणे.

३) कार्यक्रमासाठी यथायोग्य तांत्रिक पाठबळ पुरविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची निवड करणे.

४) स्वयंसेवी संस्थांच्या कामाची देयके वेळेत व कामाच्या प्रमाणात होत असल्याची खात्री करणे.

५) प्रकल्पात जेथे शक्य असेल तेथे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची सांगड (Convergence) घालणे.

६) सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आवश्यकता भासल्यास, या मार्गदर्शक सुचनांचा गाभा कमी न करता आवश्यकतेनुसार किरकोळ अनुषंगिक सुधारणा/फेरफार करण्याचा निर्णय घेणे.

७) समितीची २ महिन्यातून एकदा घेण्यात यावी.

**४. ग्रामपंचायत निवडीचे निकष :**

ग्रामपंचायतची निवड करतांना सर्वसाधारणपणे खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामपंचायतीकडील मजुरांची उपलब्धता व येणाऱ्या महिन्यात मजुरांकडून होणारी कामाची अपेक्षित मागणी विचारात घ्यावी. ही बाब अत्यावश्यक आहे.

२) पाणलोट प्रकल्पात सुक्ष्म पाणलोटाचे सर्वसाधारणपणे सरासरी किमान ५०० हेक्टर क्षेत्र उपलब्ध असावे.

३) पाणलोट विकासासाठी डोंगराळ व हलक्या जमिनी असणारा भाग शक्यतो निवडण्यात यावा, जेणे करून या भागात कामे झाल्यानंतर तात्काळ परिणाम दिसून येतील.

४) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, कृषि विभाग व महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर यांनी निश्चित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार पाणलोटाची निवड करणे आवश्यक राहील.

५) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत निवडलेली गावे, ज्या ठिकाणी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सांगड(Convergence) घालून गावातील सर्व कामे पूर्ण होतील अशा ग्रामपंचायती तसेच अमरावती विभागात CAIM प्रकल्पांतर्गत निवडलेली गावे/ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्र या कार्यक्रमासाठी निवडण्यात यावे.

६) स्वयंसेवी संस्थेने शिफारस केलेल्या ग्रामपंचायती किंवा स्वयंसेवी संस्थांची यापूर्वीची गावाची ओळख आणि त्यांना कामांची अंमलबजावणी करणे सोईस्कर होईल अशी गावे.

## ५. स्वयंसेवी संस्थांची निवड :

१) स्वयंसेवी संस्थांची निवड एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यासाठी वर्गीकृत केलेल्या (Empanelment) **अ व ब** यादीतून किंवा **राज्य संसाधन संस्था ( State Resource Organization (SRO)** च्या यादीतून करण्यात यावी. (सदर संस्थांची यादी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, कृषि आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे १ या कार्यालयात तसेच नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) रोजगार हमी योजनेच्या www.mahaegs.gov.in या संकेतस्थळावर "शासन परिपत्रके" येथे उपलब्ध आहे.)

२) उपरोक्त यादीमधून स्वयंसेवी संस्थांची निवड करतांना जिल्हयात पूर्वीपासून कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या निवडीला प्रथम प्राधान्य देण्यात यावे. जर या संस्था त्या जिल्हयात काम करावयास इच्छूक नसतील तर शेजारच्या जिल्हयातील किंवा महसूल विभागातील स्वयंसेवी संस्थांचा प्रकल्प राबविण्यासाठी विचार करण्यास हरकत नाही जेणे करून या संस्थांचा असलेला स्थानिक परिचय प्रकल्प यशस्वी करण्यास उपयोगी होईल.

३) केंद्र किंवा राज्य शासनाने बंदी घातलेल्या (Black listed) स्वयंसेवी संस्थांची निवड करण्यात येवू नये.

४) स्वयंसेवी संस्थांची निवड करण्यासाठी शक्यतो ३ ते ५ स्वयंसेवी संस्थांना पाचारण करण्यात यावे जेणेकरून उचित तुलनात्मक आणि योग्य स्पर्धा होवून चांगल्या संस्थांची निवड होईल.

५) जिल्हयामध्ये हाती घ्यावयाची कामे चर्चा करून स्वयंसेवी संस्थांना राबविण्यासाठी देण्यात यावीत. तसेच एका स्वयंसेवी संस्थेस ३ ते ५ सुक्ष्म पाणलोटापेक्षा जास्त पाणलोट (सर्वसाधारणपणे १५०० ते २५०० हेक्टर क्षेत्र) अंमलबजावणीसाठी दिले जाणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी. तसेच कामाचे वाटप अशाप्रकारे करावे जेणेकरून एका स्वयंसेवी संस्थेला दिलेले सुक्ष्म पाणलोट हे शक्यतो एकमेकांच्या जवळ असतील.

## ६. स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी :

स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील.

१) सुक्ष्म पाणलोटाचा पाणलोट कामाचा आराखडा शास्त्रोक्त पद्धतीने माथा ते पायथा या तत्वानुसार व **परिशिष्ट-अ** मध्ये दिल्यानुसार मराठी व इंग्रजी भाषेत तयार करून ५ प्रतीत सादर करणे.

२) ग्रामपंचायतींना मृद व जलसंधारण कामासंदर्भात तसेच जल, जंगल व जमीन यांच्या जबाबदार आणि शाश्वत (Sustainable) वापराबाबत माहिती देवून मानसिकदृष्ट्या तयार करणे तसेच या कामामुळे होणारे फायदे आणि याबाबतची ग्रामपंचायतीची जबाबदारी याची माहिती देणे.

३) कामांचे मोजमाप घेण्यासाठी गावातील तरूणांची तांत्रिक क्षमता तयार करणे.

४) गावातील लोकांना पाणलोट विषयासंदर्भातील तांत्रिक माहिती देणे.

५) काम सुरू करण्यासाठी कामाची आखणी करण्यास मदत करणे तसेच प्रगतीपथावरील काम हे त्यांनी तयार केलेल्या पाणलोट कामाच्या आराखड्यानुसार होत आहे, याची देखरेख करणा-या विभागाच्या अधिकाऱ्यांना सहकार्य करणे. पाणलोट कामाचा आराखडा तयार करतांना स्वयंसेवी संस्थांना नेमून दिलेले पाणलोट क्षेत्राचे विविध नकाशे उदा. Cadastral, Drainage Map, Slope Map, Land use map, Ground water map प्रचलित पद्धतीने वापरावे.

**७. स्वयंसेवी संस्थांना करावयाचे प्रदान व त्याची पद्धत :**

१) एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमाच्या धर्तीवर पाणलोट कामाचा आराखडा तयार करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना रू. १२०/प्रती हेक्टर या मापदंडाप्रमाणे मानधन देण्यात यावे.

२) स्वयंसेवी संस्थांना जनजागृती करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे व कामाची आखणी करणे या कामासाठी रू. ३०/प्रती हेक्टर या प्रमाणे मानधन देण्यात यावे.

३) स्वयंसेवी संस्थांना उपरोक्त मानधन खालीलप्रमाणे देण्यात यावे :

I. अनुज्ञेय मानधनाच्या १० टक्के रक्कम तहसिलदार/गट विकास अधिकारी यांनी कार्यारंभ आदेश दिल्यानंतर अदा करावी.

II. पाणलोट कामाचा आराखडा तयार केल्यानंतर ५० टक्के रक्कम अदा करावी.

III. कामाचे अंदाजपत्रक संस्थेने सादर केल्यानंतर ३० टक्के रक्कम अदा करावी. (ही रक्कम संस्थेने अंदाजपत्रक टप्प्याटप्प्याने तयार करुन सादर केल्याप्रमाणे अदा करावी.)

IV. प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यानंतर १० टक्के रक्कम अदा करावी.

V. जन जागृती, तांत्रिक मार्गदर्शन करण्याची कामे पूर्ण केल्यानंतर संस्थेस द्यावयाची रक्कम रू. ३०/- प्रती हेक्टर ही केलेल्या कामाचा अहवाल व त्याचे फोटोग्राफ्स प्राप्त झाल्यानंतर त्वरीत अदा करण्यात यावी.

VI. स्वयंसेवी संस्थांना द्यावयाची रक्कम ही योजनेच्या अनुज्ञेय प्रशासकीय खर्चातून भागविण्यात यावी. ही रक्कम जिल्हाधिकारी यांचे मार्फत वरीलप्रमाणे काम झाल्याच्या आधारावर संबंधित संस्थेस ६% निधीतून अदा करण्यात यावी. उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी ही रक्कम स्वयंसेवी संस्थांना वेळेवर अदा केली जात आहे याची खात्री करावी.

VII. प्रकल्पाचे काम टप्पेनिहाय करण्यात येईल जेणेकरून स्वयंसेवी संस्थांना द्यावयाची रक्कम सातत्याने त्यांना मिळत जाईल व यामध्ये पारदर्शकता राहील याची खबरदारी घ्यावी.

VIII. एखाद्या स्वयंसेवी संस्थेची त्यांच्या मोबदल्याबद्दल तक्रार असेल तर जिल्हाधिकारी यांनी ती तात्काळ विचारात घेवून निवारण करावे जेणे करून स्वयंसेवी संस्थांना लहान प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहन मिळेल.

IX. शासनाने निर्धारित केलेल्या दरा व्यतिरिक्त रक्कम बाह्य संस्थेकडून स्वयंसेवी संस्था घेऊ शकतील, मात्र, ही बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात यावी.

**८. कार्यक्रम अंमलबजावणीची पद्धत :**

१) जिल्हा समितीच्या पहिल्या सभेत स्वयंसेवी संस्था आणि ग्रामपंचायतीची निवड तात्पुरत्या स्वरूपात करण्यात यावी. जेंव्हा कधी आवश्यकता असेल त्यावेळी वेळ वाचविण्यासाठी समितीने परिसंचारण (Circulation) पद्धतीने निर्णय घ्यावा.

२) ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी/तांत्रिक अधिकारी यांचे समवेत ग्रामपंचायतीस भेट देवून ग्रामसभा/ग्रामपंचायतीचे ठराव घेण्यास स्वयंसेवी संस्था मदत करतील. ठरावात गावात ग्रामपंचायत काम करेल व स्वयंसेवी संस्था प्रकल्पाचा पाणलोट कामाचा आराखडा तयार करून जन जागृती आणि तांत्रिक सहाय्य करतील असे स्पष्ट नमूद करण्यात यावे.

३) पाणलोट प्रकल्प सुरू करण्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव प्राप्त करणे आवश्यक आहे.

४) पाणलोट कामाचा आराखडा ग्रामपंचायतीचा ठराव न घेता सुरू केला आणि जर ग्रामपंचायतीने प्रकल्प नाकारला तर त्यावरील खर्च निष्फळ जाईल, म्हणून ग्रामपंचायत ठराव प्राप्त झाल्यानंतर स्वयंसेवी संस्थेस **परिशिष्ट-ब** नुसार कार्यारंभ आदेश देण्यात यावा. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर संपन्न होणा-या ग्रामसभेच्या आगामी बैठकीत ग्रामसभेचा ठराव घेण्यात यावा.

५) पाणलोट कामाचा आराखडा संपुर्ण सुक्ष्म पाणलोटासाठी तयार करण्यात यावा. यामध्ये साधारणपणे एका ग्रामपंचायतीचे क्षेत्र किंवा अंशतः क्षेत्राचा समावेश असेल. तथापि, सुक्ष्म पाणलोटाचे क्षेत्र जर एकाहून अधिक ग्रामपंचायत क्षेत्रात येत असेल तर कामे शास्त्रोक्त पद्धतीने होण्यासाठी दोन्ही ग्रामपंचायत क्षेत्राचा समावेश करावा. परंतु त्यास संबंधित गावाच्या ग्रामसभेची मान्यता आवश्यक राहील.

६) व्यावहारिक दृष्टिकोनातून प्रत्यक्ष कामे पूर्ण करण्यासाठी क्षेत्राचे टप्पे करणे आवश्यक राहील. यामध्ये नेट प्लॅनिंग नुसार (सर्व्हे/गट नंबर प्रमाणे) एक हेक्टर किंवा कमी क्षेत्राच्या भौगोलिक परिस्थितीचा व जमीन मालकाच्या आर्थिक सामाजिक स्थितीचा विचार करावा. अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यासाठी ५० हेक्टर क्षेत्र मर्यादेत किंवा रू. ६ लक्ष किंमतीचे किंवा त्याहून कमी क्षेत्राचे (२५ ते ४० हेक्टर) भाग करावेत. तसेच यासाठी MIS मध्ये स्वतंत्र कामाचा संकेत क्रमांक असेल. यामुळे कामे लवकर सुरू करणे शक्य होईल तसेच कामे पूर्ण करून काम पूर्णत्वाचे दाखले देणे सोईचे होईल. प्रत्येक कामासाठी स्वंतत्र पुर्णत्वाचा दाखला देणे आवश्यक राहील. कामाची नोंद MIS मध्ये Water Conservation and Water Harvesting या वर्गवारीत करण्यात यावी.

७) प्रकल्पातील कामे माथा ते पायथा या तत्वानसारच हाती घेण्यात यावीत.

**९. अंमलबजावणी करणारी यंत्रणा आणि तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे :**

१) या प्रकल्पाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा ग्रामपंचायत असेल. प्रकल्पातील कामांना प्रशासकिय मान्यता संबंधित गट विकास अधिकारी देतील. कामे जरी ग्रामपंचायत मार्फत होणार असली तरी या कामांना तांत्रिक मान्यता संबंधित तालुक्याचे तालुका कृषि अधिकारी किंवा पाणलोट क्षेत्राचे ज्ञान असलेले इतर तत्सम अधिकारी देतील. संबंधित जिल्हयाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी हे वेळेत कामांना तांत्रिक मान्यता देतील असे पहावे. कामावरील मजुरांची हजेरी ग्राम रोजगार सेवक घेतील व संबंधित ग्रामपंचायतीचे ग्राम सेवक हजेरी पत्रकास प्रतिस्वाक्षरीत (Countersign) करतील. **कामाची मोजमापे नेहमीप्रमाणे पंचायत समिती स्तरावरील तांत्रिक अधिकारी (किंवा कंत्राटी पध्दतीवरील तांत्रिक अधिका-याने घेतलेल्या मोजमापास संबंधित नियमित अधिकारी प्रतिस्वाक्षरीत करतील) प्रचलित पध्दतीने घेतील.**

२) जर काही प्रकल्प कृषि विभागास (संलग्न विभाग) अंमलबजावणी करण्यास द्यावयाचे असतील तर तसे करण्यास जिल्हा समितीला मुभा राहील. मात्र अशा कामांना तहसिलदार यांचेकडून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

३) या प्रकल्पातील सर्व कामांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्व अटी व शर्थी लागू राहतील.

**१०. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (कृषि विभाग) यांची प्रकल्पातील भुमिका :**

१) या प्रकल्पात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तांत्रिक पाठबळ (Technical Support) पुरवतील व प्रकल्प यशस्वी करुन शेतीची उत्पादकता सुधारण्यात अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावतील.

२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे स्वत: या प्रकल्पांना भेट देतील किंवा त्यांचे हाताखालील वर्ग-१ दर्जाहुन कमी नसतील अशा अधिका-यांमार्फत प्रकल्पातील कामांना भेट देतील.

३) पाणलोट कामाचा आराखडा तयार करणेसाठी आवश्यकतेप्रमाणे लागणारे सर्व नकाशे व कामाची नमुना अंदाजपत्रके स्वयंसेवी संस्थाना उपलब्ध करून देतील.

४) सदरचे प्रकल्प पर्जन्यश्रयी क्षेत्रासाठी खुपच उपयुक्त आहेत. त्यामुळे प्रकल्पांतर्गत कामांना तांत्रिक मान्यता संबंधित तालुका कृषि अधिकारी वेळेत देतात याची शहानिशा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी करतील.

**११. वन विभागाची भुमिका :**

काही वेळेस पाणलोटाचा वरचा भाग वन क्षेत्राखाली येतो, म्हणुन एकात्मिक पद्धतीने पाणलोट उपचारित करण्यासाठी वन विभागाने आवश्यक ते सहकार्य देणे आवश्यक आहे. याबाबतचे सर्व मुद्दे जिल्हा समितीने सोडवावेत.

**१२. इतर महत्त्वाचे मुद्दे :**

१) पाणलोट कामाचे महत्त्व समजावे म्हणून स्वयंसेवी संस्थानी ग्रामपंचायत सरपंच व सदस्य, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक आणि तांत्रिक अधिकारी यांची जवळच्या यशस्वी पाणलोटास भेट घडवून आणावी.

२) मोजमापे घेणे व मजुरांची रक्कम अदा करणे यासाठी ई-मस्टरचा वापर करण्यात यावा.

३) जिल्हाधिकारी यांनी आवश्यकता भासल्यास रोहयो कायदा- कलम-६ अन्वये दिलेल्या शक्तीचा वापर करुन आवश्यक ते निर्देश संबंधित तांत्रिक विभागास व इतर अधिका-यांना द्यावे.

४) स्वयंसेवी संस्था प्रकल्पाच्या कोणत्याही टप्प्यावर काम करताना ठरवून दिलेल्या मानकापेक्षा कमी काम करत असल्याचे दिसून आल्यास जिल्हाधिकारी त्यांचे देयक थांबवतील किंवा काम निलंबित करतील. तसेच स्वयंसेवी संस्थाना त्यांचे म्हणणे जिल्हा समितीसमोर मांडणेची संधी देवून आवश्यकता भासल्यास त्यांचेकडील प्रकल्प काढून घेतील.

५) प्रकल्प यशस्वी होणेसाठी सर्व संबंधितानी सहकार्य करणे अपेक्षित असेल.

६) प्रकल्पांतर्गत भौगोलिक परिस्थिती, जमिनीचा उतार व तांत्रिक सुचनाप्रमाणे कामाचे नियोजन करण्यात यावे.

७) सद्यस्थितीत मजुरीचा दर रू. १६२ असा निर्धारित करण्यात आलेला आहे. त्यामुळे या मजुरीदरानुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मान्यता असेल. तसेच यापुढे वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या मजुरीदरानुसार कामाचे अंदाजपत्रक सुधारित करण्यात यावे.

८) स्वयंसेवी संस्था, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, गटविकास अधिकारी, तांत्रिक अधिकारी/कंत्राटी तांत्रिक अधिकारी (पंचायत समिती) ग्रामरोजगार सेवक व ग्रामसेवक यांनी या कार्यक्रमांतर्गत पार पाडावयाची जबाबदारी सदर शासन निर्णयानुसार निर्धारित केली आहे. त्याचा उदाहरणादाखल नमूना **परिशिष्ट-क** मध्ये देण्यात आला आहे. या आधारे व शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी जबाबदारी निश्चीतीचे स्वयंस्पष्ट आदेश निर्गमित करावेत.

९) उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ येथील अनुक्रमे शासन निर्णय व शासन पत्र अधिक्रमित जरी करण्यात आले असले तरी सदर शासन निर्णय/शासन पत्रानुसार पथदर्शी प्रकल्पातील सुरू असलेली कामे तशीच पुढे सुरू ठेवून पूर्ण करण्यात यावीत. तद्नंतर हा शासन निर्णय पथदर्शी जिल्हयात अंमलात येईल.

**१३. कामाची तपासणी :**

या प्रकल्पांतर्गत झालेल्या कामाची तपासणी उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयात नमूद मार्गदर्शक सूचनांनुसार खालील अधिकाऱ्यांनी करणे अनिवार्य आहे.

१. **राज्य स्तर** : उपायुक्त (कृषि), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपूर.

२. **विभाग स्तर** : अधिक्षक कृषि अधिकारी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) विभागीय आयुक्त कार्यालय.

३. **जिल्हा स्तर** : अ. उपजिल्हाधिकारी (रोहयो), उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (ग्रामपंचायत), गट विकास अधिकारी, नरेगा (जि.प. कार्यालय), उप अभियंता (जलसंपदा) जिल्हाधिकारी कार्यालय ब. कृषि अधिकारी (वर्ग-२) मनरेगा कक्ष, जि.प. कार्यालय

४. **तालुका स्तर** : तहसिलदार/गटविकास अधिकारी व तालुका कृषि अधिकारी.

**१४. कार्यक्रमाचा आढावा :**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी संयुक्तपणे किमान महिन्यातून एकदा या कार्यक्रमाचा आढावा घ्यावा तसेच कार्यक्रमाच्या प्रगतीबाबतचा त्रैमासिक अहवाल विभागीय आयुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय यांना सादर करावा. विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागाचा एकत्रित अहवाल शासनास सादर करावा. तसेच आयुक्त (नरेगा) यांनीही सदर कार्यक्रमाचा दरमहा आढावा घ्यावा व NGO च्या अडी अडचणीचे निराकरण करावे.

उपजिल्हाधिकारी (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालयातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, संबंधित जिल्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (गामपंचायत) यांना कार्यक्रम यशस्वी करण्याची संपुर्ण जबाबदारी सोपविण्यात येत असून त्यांनी त्यांच्या जिल्हयातील सर्व यंत्रणांमध्ये योग्य तो समन्वय साधावा व कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाची भूमिका निभवावी.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३११११८१४२९३९०५१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावावे,**

**(आर. विमला)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**
22/11/2013

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
आयुक्त, आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य , पुणे
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी नियोजन विभाग (रोहयो)
सारसंग्रह रोहयो-१/ निवडनस्ती (रोहयो.१)

## परिशिष्ट अ

## पाणलोट कामाचा आराखडा तयार करणे

### भाग १

| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पान नं |
|---|---|---|
| १ | कार्य सारांश | |
| २ | प्रकल्पाची पार्श्वभूमी व प्रस्तावना | |
| ३ | प्रकल्पाची सर्व साधारण माहिती | |
| ४ | पायाभूत सर्वेक्षण | |
| ५ | प्रकल्पाचे नियोजन व कृति आराखडा | |
| ६ | जनजागृती व प्रचार आराखडा (क्षमता बांधणी आराखडा) | |
| ७ | कार्यक्रम अंमलबजावणी टप्पे व अर्थिक कार्यक्रम | |
| ८ | प्रकल्पाचे अपेक्षित परिणाम (Expected outcomes) | |
| ९ | पाणलोटाचे नकाशे | |

### भाग २

पाणलोट कामाच्या आराखड्याची माहिती द्यावी (एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाप्रमाणे)

### भाग ३

काम निहाय अंदाजपत्रके कामाच्या टप्प्याप्रमाणे भाग १ मधील अ.क्र. ७ प्रमाणे तयार करून सादर करावीत. पहिल्या टप्प्याची कामे पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील अंदाजपत्रके तयार करून सादर करावीत. संदर्भ क्रमांक ४ येथील ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दिनांक ५ मार्च, २०१३ नुसार निर्धारित केलेले तांत्रिक मापदंड अंदाजपत्रके तयार करण्यासाठी वापरण्यात यावेत व जलसंधारण विभागाने वेळोवेळी सुधारित केलेले तांत्रिक मापदंड वापरण्यात यावेत. तथापि, मजुरीचे मापदंड रोहयो विभागामार्फत वेळोवेळी निश्चीत करण्यात येणाऱ्या मजुरी दराप्रमाणे राहतील. त्याप्रमाणे कामांची अंदाजपत्रके तयार करण्यास मान्यता असेल.

## परिशिष्ट ब

**(ग्रामपंचायत ठराव प्राप्त झाल्यांनतर स्वयंसेवी संस्थांना द्यावयाचा कार्यारंभ आदेश नमुना)**

प्रति,

-------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

शासन निर्णय क्रमांक ------------------------------------------------, दिनांक / /
नुसार जिल्हा समिति, जिल्हा --------------------------- खाली नमुद केल्याप्रमाणे पाणलोट कामाचा आराखडा तयार करण्याची, तांत्रिक पाठबळ पुरविण्याची व जनजागृती कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी आपणावर सोपविण्यात येत आहे.

| **तालुका/तहसिल** | **ग्रामपंचायतीचे नाव** | **अंमलबजावणी यंत्रणा** | **सुक्ष्म पाणलोटाची नावे (कृषि विभाग/भूजल सर्वेक्षण यंत्रणेनुसार)** |
|---|---|---|---|
| | | | |

२. प्रकल्पासंबंधी पुढील कार्यवाही करिता आपण संबंधित तालुक्याचे तहसिलदार/गट विकास अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

३. आपल्या कामाचा अहवाल तहसिलदार/गटविकास अधिकारी यांना सादर केल्यानंतर शासनाच्या प्रचलित तरतूदींनसुार आपणास मोबदला अदा करण्यात येईल. आपणास याबाबत काही अडचण/शंका असल्यास या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

५. स्वयंसेवी संस्थेची जबाबदारी उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्यानुसार राहील. या बाबत आपली काही अडचण वा वाद असले तर आपण जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचेशी संपर्क साधू शकता.

६. प्रकल्पाच्या कोणत्याही टप्प्यावर ठरवून दिलेल्या मानकापेक्षा आपण काम कमी करत असल्याचे दिसून आल्यास जिल्हाधिकारी किंवा जिल्हा समितीस आपले तात्पुरते देयक थांबविण्याचा किंवा काम निलंबित करण्याचा अधिकार असेल. तथापि, या बाबत अंतीम निर्णय घेण्यापूर्वी आपणास आपले म्हणने जिल्हाधिकारी/जिल्हा समिती समोर मांडण्याची संधी देण्यात येईल. जिल्हाधिकारी/जिल्हा समितीचा च्या निर्णयाविरोधात आपणास विभागीय आयुक्त यांचेकडे अपील करता येईल सदर प्रकरणी विभागीय आयुक्त यांचा निर्णय अंतीम असेल.

७. सदर कार्यारंभ आदेशातील अटी व शर्थी स्वयंसेवी संस्थेला मान्य असल्याचे प्रमाणपत्र संस्थेला देणे बंधनकारक राहील.

**उप जिल्हाधिकारी तथा**
**सदस्य सचिव, जिल्हा समिती,** ------------

प्रत,

१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ------------------
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
३. तहसिलदार, -----------
४. गटविकास अधिकारी, ----------
५. तालुका कृषि अधिकारी, --------------

## परिशिष्ट-क

### कार्यक्रमांतर्गत पार पाडावयाची जबाबदारी नमूना.

| अ. क्र. | अंमलबजावणी करणारी यंत्रणा | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | जिल्हास्तर समिती | १. पाणलोट कामाच्या आराखडयास मान्यता देणे<br>२. ग्रामपंचायतीची व स्वंयसेवी संस्थांची निवड करणे.<br>३. शक्यअसल्यास एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाशी सांगड (Convergence) घालणे. |
| २ | जिल्हाधिकारी | १.स्वयंसेवी संस्थांना मानधन अदा करणे.<br>२.कार्यक्रमाचे संनियंत्रण करणे.<br>३. कामाची तपासणी करणे. |
| ३ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | १. स्वयंसेवी संस्थांना नकाशे व कामाची नमुना अंदाजपत्रके उपलब्ध करुन देणे.<br>२. तालुका कृषि अधिकारी यांना कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे निदेश देणे.<br>३. कामाची तपासणी करणे. |
| ४ | तालुका कृषि अधिकारी | १. अंदाजपत्रके तपासून तांत्रिक मान्यता (Technical Sanction) देणे.<br>२. कामांची तपासणी करणे. |
| ५ | (ग्रामपंचायतीसाठी) - गट विकास अधिकारी<br>(कृषि विभागासाठी)- तहसिलदार | १. प्रकल्पातील कामांना प्रशासकिय मान्यता देणे.<br>२. कार्यारंभ आदेश देणे.<br>३. प्रकल्पातील कामावरील मजुरांना मग्रारोहयो अंतर्गत मजुरी अदा करणे.<br>४. कामांची तपासणी करणे |
| ६ | ग्राम रोजगार सेवक | १. मजुरांची हजेरीपत्रकावर हजेरी नोंदविणे. |
| ७ | ग्रामसेवक | १. हजेरीपत्रक प्रतिस्वाक्षरी (Countersign) करणे<br>२. गाव पातळीवर प्रकल्पातील कामे यशस्वीरित्या राबविण्यासाठी आवश्यक ती मदत स्वयंसेवी संस्थांना (NGO) करणे |
| ८ | तांत्रिक अधिकारी/कंत्राटी तांत्रिक अधिकारी (पंचायत समिती) | कामाची मोजमापे घेऊन त्याची नोंद मापन पुस्तिकेवर) MB( नोंदविणे. |
| ९ | तांत्रिक अधिकारी | कंत्राटी तांत्रिक अधिकारी यांनी घेतलेल्या मोजमापांना व त्याची नोंदी झालेल्या मापन पुस्तिकांना प्रतिस्वाक्षरीत करणे (Countersign) |
| १० | स्वयंसेवी संस्था (NGO) | १.पाणलोट कामाचा आराखडा तयार करणे.<br>२. कामाचे अंदाजपत्रके तयार करणे.<br>३. तांत्रिक मार्गदर्शन व जनजागृती करणे. |